**प्रेसनोट** दि. 24/04/2026

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विभाग, शिवाजी नगर पुणे येथील वरिष्ठ भूवैज्ञानिक व कनिष्ठ भूवैज्ञानिक यांचे विरोधात लाच मागणी व लाच स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7,12 |
| तक्रारदार | पुरुष वय 46 वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | 1) श्री. दिवाकर नामदेव धोटे वय 53 वर्षे, पद- वरिष्ठ भूवैज्ञानिक, नेमणूक - वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विभाग, शिवाजी नगर पुणे रा.ठी.रूम नंबर 902, संकेश्वर रॉयल सोसायटी जाधव वाडी, चिखली, पुणे (वर्ग 1 )<br>2) श्रीमती प्रियंका संदीपान घुले, वय 39 वर्ष, पद - कनिष्ठ भूवैज्ञानिक, नेमणूक - वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विभाग, शिवाजी नगर पुणे रा. कुमार प्रिन्स विल्हे, जाधव वाडी, मोशी पुणे. नेमणूक - वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विभाग, शिवाजी नगर पुणे. (वर्ग 2) |
| सुरवातीची लाच मागणी | रू.2,50,000/- (अडीच लाख रुपये) |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | रू.2,00,000/- (दोन लाख रूपये) |
| पडताळणी दिनांक | दि. 22/04/2026 रोजी |
| स्वीकारलेली लाच रक्कम | रू.2,00,000/- (दोन लाख रूपये) |
| सापळा दिनांक | दि. 24/04/2026 रोजी |
| ठिकाण | वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विभाग, शिवाजी नगर पुणे |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्री. सुहास हट्टेकर , पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र.9881873330) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री खंडेराव रंजवे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9923486428) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक असुन त्यांचे इमारतीच्या बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळणेकामी PMRDA कडे अर्ज केला असता PMRDA ने भुजल सर्वेक्षण अहवाल सादर करणेबाबत कळविले. म्हणून तक्रारदार यांनी भूजल सर्वेक्षण अहवाल मिळणेकामी भूजल सर्वेक्षण विभाग पुणे यांना अर्ज केला असता, सदर भुजल सर्वेक्षण अहवाल देणेकमी तेथील लोकसेवक घुले मॅडम यांनी लोकसेवक श्री धोटे यांचेसाठी 2,50,000 रुपये लाच मागणी केली म्हणून दिनांक 22/04/2026 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. 22/04/26 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, लोकसेवक श्रीमती घुले यांनी लोकसेवक श्री धोटे यांना भेटून बोलण्यास सांगितले त्यानंतर तक्रारदार हे श्री धोटे यांना भेटले असता त्यांनी पंचासमक्ष तडजोडी अंती 2,00,000/- स्विकारण्याचे मान्य करून सदर लाचेची रक्कम श्रीमती घुले मॅडम यांचेकडे देण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक 24/04/2026 रोजी सापळा करवाई करण्यात आली असता, लोकसेविका श्रीमती प्रियंका घुले यांना तक्रारदार यांचेकडून 2,00,000/- (दोन लाख) रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक श्री दिवाकर धोटे यांना देखील त्यांचे कार्यालयातून ताब्यात घेण्यात आले आहे.

वर नमुद आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

सहायक पो आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
* ॲन्टी करप्शन ब्युरो *

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे